
PDF Compressor Free Version

# निसर्ग भ्रमण

## योजना




**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ**

बंगला नं.१०/२, स्टार्की टाऊन, सदर, मंगळवारी मार्केटचे जवळ, नागपूर - ४४० ००१

PDF Compressor Free Version

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ

# “ निसर्गभ्रमण ”

महाराष्ट्र राज्याचे निसर्ग पर्यटन धोरण सन २००८ मध्ये जाहीर करण्यात आले आहे व त्या अनुषंगाने डिसेंबर २०१५ मध्ये महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील अनेक शेतकरी, खाजगी उद्योजक तसेच अशासकीय संस्था वन पर्यटनाच्या क्षेत्रामध्ये महत्वाची भुमिका बजावु शकतात. पर्यटकांना महाराष्ट्राचे वनवैभव तसेच वन पर्यटनाची ओळख करून देणे व वन तथा वन्यजीव विषयक काही बाबीसाठी वेगळा अनुभव घेवू देण्यास उपयोगी ठरु शकतात. **या वनातून पदभ्रमण, पक्ष्यांची ओळख, रोपवाटिका पर्यटन, साहसी खेळ, वनस्पतिंची ओळख तसेच वनाशी संबंधित इतर गतिविधी यांचा समावेश केला जावु शकतो.** वन पर्यटन क्षेत्रात अशा उपक्रमांना एका छत्राखाली आणण्याकरिता तसेच वनपर्यटनाला चालना देण्याकरिता असे इच्छुक शेतकरी, उद्योजक आणि अशासकीय संस्थांना महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाकडे नोंदणी करण्यास खालील अटी व शर्तींचे अधिन राहुन महाराष्ट्र शासन पत्र क्रमांकः डब्ल्यूएलपी-०११८/ प्र.क्र. ३४/फ-१ दिनांक २८/०३/२०१८ नुसार परवानगी दिलेली आहे.

निसर्ग पर्यटनाशी निगडीत उपक्रमांना निसर्ग पर्यटन मंडळाकडे नोंदणी करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत असुन अशा उपक्रमांना नोंदणीसाठी आवश्यक बाबी खालील प्रमाणे राहतील.

(१) अर्जदाराद्वारे जेथे योजना राबविली जाते त्या जागेचे मालकीपत्र, सातबारा उतारा/प्रॉपर्टी कार्ड/ मालकाचे संमतीपत्र अथवा वापर परवाना (आवश्यक असेल तेथे).

(२) जागेची सद्यः स्थितीतील भरलेली घरपट्टी आणि वीज/पाणी/दुरध्वनी देयक भरल्याची पावती.

(३) अर्जदाराचा स्थानिक पोलिस पाटील/पोलिस निरीक्षक/पोलिस अधिक्षक यांचेकडुन चारित्र्य पडताळणी दाखला.

(४) विहीत नमुन्यातील नोंदणी अर्ज.

(५) अर्जातील प्रकल्पाची माहिती व वैशिष्ट्ये (पारंपारिक पर्यटनापेक्षा वेगळे) व रंगीत छायाचित्रे.

(६) सुरक्षा, आरोग्य व प्रकल्पाबाबत अधिकृत माहिती याबद्दल थोडक्यात तपशील.

(७) पर्यटकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा तपशील व केंद्रात आदरातिथ्य करणारे सेवकवर्ग असावेत, जेणेकरून पर्यटक केंद्रामध्ये आनंदमयी व समाधानाच्या वातावरणात राहतील.

(८) पर्यटकांसाठी देण्यात येणारे टूर पॅकेज/अथवा सेवा करमणूकीचे अभ्यासाचे कार्यक्रम त्यांच्या दरपत्रकासह.

(९) अर्जदाराचे व प्रकल्पाच्या ठिकाणी व्यवस्था पहाणाऱ्या व्यक्तीचा तपशील व रंगीत छायाचित्र/ बदललेल्या व्यक्तीची माहिती वेळोवेळी कार्यालयाला कळवावी.

PDF Compressor Free Version

# ठळक मार्गदर्शक तत्वे

(१) संबंधित प्रकल्प हा महाराष्ट्र राज्यात असावा.

(२) पर्यटकांना उपलब्ध करून देण्यात येणारी पॅकेजेस, सेवा-सुविधा, अनुभव खालील विषयांवर आधारीत असावीत.

★ वन रोपवन/रोपवाटिका, ★ निसर्ग, ★ ऐतिहासिक वारसा,
★ जंगले व पर्यावरण ★ पक्ष्यांची/वनस्पतींची ओळख ★ जंगलातील ट्रॅकींग व कॅम्पींग
★ साहसी क्रिडा (यासाठी संबंधित जिल्हा क्रिडा अधिकारी यांच्याकडील नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे)

(३) पॅकेजेस पर्यटनाच्या रूढ संकल्पनेपेक्षा वेगळी अनूभुती देणारी असावीत.

(४) योजनेसंबंधी अधिकृत माहिती देणारे प्रशिक्षित सेवक/मार्गदर्शक असावेत.

(५) पर्यटकांची वैयक्तिक सुरक्षा तसेच त्यांच्या सामानाची काळजी घेतली जावी.

(६) स्वच्छता व आरोग्य यांची दक्षता व उपाययोजना असावी.

(७) प्रसाधनगृह, खानपान, निवास व्यवस्था दर्जेदार असावी.

(८) महाराष्ट्राची संस्कृती, कला, लोककला, पाककला, परंपरा याबद्दल माहिती असावी व त्यांच्या प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रचारासाठी प्रयत्न व्हावेत.

(९) महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या नियुक्त अधिकाऱ्यांना प्रकल्प/योजनेला भेट देण्याचा अधिकार असेल व त्या संबंधित अधिकाऱ्याने मागितलेली माहिती देणे बंधनकारक असेल.

(१०) नोंदणी केलेल्या योजनेबाबत तक्रारी आल्यास व पाहणीअंती त्या योग्य व खऱ्या आढळल्यास दिलेले नोंदणीपत्र रद्द करण्याचा महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाला अधिकार असेल, तथापि तत्पूर्वी अशा तक्रारी दूर करण्याविषयी व त्याबाबत स्पष्टीकरण देण्याविषयी नोंदणी धारकाला संधी देण्यात येईल.

(११) या योजनेमध्ये नोंदणी करण्यासाठी स्थळ पाहणी, कागदपत्र तपासणी, अहवाल बनविणे व प्रमाणपत्र वितरण यासाठी रु. ३०००/- (अक्षरी- रुपये तीन हजार मात्र) शुल्क आकारण्यात येईल.

(१२) निसर्गभ्रमण योजनेंतर्गत नोंदणी १ वर्षाकरिता रु. ३०००/- व त्यानंतरचे नुतनीकरण ३ वर्षाच्या कालावधीकरिता विनाशुल्क देण्यात येईल.

(१३) योजनेसाठी इतर सर्व कायद्यांच्या औपचारिकतेसंदर्भात आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील अश्या उल्लेखाचा प्रतिज्ञापत्रात समावेश असावा.

(१४) अर्जदाराने पर्यटकांसाठी कमीत कमी एक ते दोन दिवसाचे वेगळा अनुभव देणारे पॅकेज उपलब्ध करून देणे आवश्यक राहिल त्याबाबत सविस्तर विवेचन सादर करावे लागेल.

PDF Compressor Free Version

(१५) जर यामध्ये हॉटेल व इतर मालमत्ता उपयोगात येणार असेल. ती मालमत्ता व्यवसायासंदर्भात असलेल्या सर्व परवानग्या घेणे ही प्रकल्पधारकाची जबाबदारी असेल.

(१६) निसर्ग भ्रमणाच्या खाली दिलेला लोगो हा तुमच्या जाहीरात / माहीती फलकावर दर्शविणे आवश्यक राहील.

निसर्गभ्रमण

निसर्गभ्रमण योजनेखाली नोंदणी करण्याकरिता अर्ज आपले क्षेत्राचे मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचेमार्फत त्यांचे शिफारसीसह महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालयास सादर करावा.

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ कार्यालयाचा पत्ता**

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
बंगला नं.१०/२, स्टाकी टाऊन, सदर, मंगळवारी मार्केटचे जवळ, नागपूर - ४४० ००१
दुरध्वनी क्र. ०७१२-२९७८८४४, ईमेल : mahaecotourism@mahaforest.gov.in

## नोंदणीपत्र धारकास मिळणारे फायदे

- महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन विकास मंडळातर्फे नोंदणीकृत योजनांची प्रसिध्दी केली जाईल त्यास प्रसिध्दी साहित्य, इंटरनेटवर संकेतस्थळ व कालांतराने ऑनलाईन आरक्षण सुविधा यांचा समावेश असेल.
- आर्थिक उलाढालीत वाढ - पर्यायाने आर्थिक फायद्यात वाढ व महाराष्ट्राच्या वन पर्यटन विकास कामाला हातभार.
- उद्योगाची व्याप्ती वाढेल.
- शासकीय मान्यतेमुळे पर्यटकांत विश्वासार्हता वाढेल व उद्योजकांची एकूण पत वाढण्यात मदत होईल.
- सहसदस्यांशी संवाद (सभा, परिसंवाद इ. द्वारे) साधुन योजनेत सुधारणा तसेच नवनवीन संकल्पना राबविता येतील.
- स्थानिक कला, लोककला, हस्तकला यांना उत्तेजन मिळेल.
- पर्यटनाचा आर्थिक लाभ ग्रामीण भागात व सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेल.
- सदर योजनेंतर्गत नोंदणी करण्याकरिता प्रपत्र सोबत सहपत्रित केले आहेत.

PDF Compressor Free Version



# निसर्गभ्रमण नोंदणी/नुतनीकरण अर्ज

(अर्ज दोन प्रतीत सादर करावा)

१) अर्जदाराचे नांव ________________

२) अर्जदाराचा संपूर्ण पत्ता : ________________

टेलिफोन नंबर : ________________

प्रकल्पाचे नांव (M/s.) ________________

प्रकल्पाचा संपूर्ण पत्ता : ________________

टेलिफोन नंबर : ________________

फॅक्स नंबर : ________________

ई-मेल/वेबसाईट : ________________

३) आपल्या प्रकल्पात पर्यटकांना कुठला अनुभव मिळेल. ________________

४) प्रकल्पाची सविस्तर माहिती, प्रकल्पाच्या ठिकाणी राबवीत असलेले उपक्रम व अनुभव :(सदर अनुभवासाठी आपल्या प्रकल्पात वर नमूद केल्याप्रमाणे पर्यटकांना कोणत्या प्रकारचा वेगळा अनुभव मिळेल याबाबत १ ते २ पानामध्ये माहिती रंगीत छायाचित्रासह द्यावी)

५) आपल्या प्रकल्पाच्या ठिकाणी पर्यटक साधारण किती वेळ घालवू शकेल याचा तपशिल ________________

६) अर्जदार पर्यटकांना त्यांच्या प्रकल्पात कोणत्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देऊ शकतात त्याचे वर्णन (नमूद केल्याप्रमाणे अधिक माहितीसाठी वेगळी माहितीपत्रक व दरपत्रक सोबत जोडावी)

चहा/कॉफी/दूध ________________ नाश्ता ________________

जेवण ________________ राहण्याची सुविधा (असल्यास) ________________

७) पर्यटकांसाठी उपलब्ध असलेल्या खोलीचे व घराचे रंगीत छायाचित्र ________________

PDF Compressor Free Version

## नोंदणी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे (दोन प्रतीत)

१. विहीत नमुन्यातील अर्ज

२. सत्यप्रतिज्ञापत्र

३. जागेचे मालकीपत्र/परवाना/मालकाचे संमतीपत्र/सातबारा उतारा/करारपत्र

४. योजनेची माहिती व वैशिष्ट्ये रंगीत छायाचित्रांसहीत

५. पर्यटकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा तपशिल

६. पर्यटकांच्या सुरक्षा, आरोग्य याबाबतचा तपशिल

७. प्रकल्पाच्या जागेची सद्य:स्थितीत भरलेली कर पावती आणि
वीज/पाणी/दूरध्वनी देयक भरल्याची पावती

८. अर्जदाराचा स्थानिक पोलिस पाटील/पोलिस निरीक्षक/पोलिस अधिक्षक
यांच्याकडून चारित्र्य पडताळणी दाखला

९. पर्यटकांसाठी उपलब्ध असलेल्या टूर पॅकेजची सविस्तर माहिती दरपत्रकासहीत

१०. अर्जदाराचे व प्रकल्पाच्या व्यवस्थापकाचा तपशील व रंगीत छायाचित्र

वर दिलेली माहिती, खरी असून मी निसर्गभ्रमण या योजनेची संपूर्ण माहिती व नियम वाचले आहे व ते मला मान्य आहेत आणि या नियमांचे पालन करण्याची जबाबदारी माझी राहील यासाठी मी बांधील आहे.

अर्जदाराचे नांव आणि सही

ठिकाण :
दिनांक:

PDF Compressor Free Version

# सत्यप्रतिज्ञापत्र / UNDERTAKING

रु. २०० च्या स्टॅम्प पेपरवर (नोटरी करून)

१. मी अर्जदार मे. (नांव आणि पत्ता) ----------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

२. शपथेवर लिहून देतो की, दिनांक -------------------- रोजी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या ''निसर्गभ्रमण'' योजनेत नोंदणीसाठी केलेल्या अर्जातील सोबतची माहिती खरी आहे. निसर्गभ्रमण ही योजना राबविताना पर्यटकांसाठी खाली नमूद केलेल्या सोईसुविधा इत्यादींची पूर्तता करणे मला बंधनकारक आहे.

- ★ अर्जात नमुद केल्याप्रमाणे पर्यटनातील वेगळा अनुभव.
- ★ पर्यटकांना राहण्याचे रूम्स सुरक्षित व स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी.
- ★ उपक्रम राबवितांना पर्यटकांच्या वैयक्तिक सुरक्षिततेची व त्यांच्या सामानाची काळजी घेण्याची संपूर्ण जबाबदारी.
- ★ निसर्गभ्रमण योजनेंतर्गत देत असलेले पॅकेज, अनुभव यांची माहिती देण्यासाठी परिपूर्ण ज्ञान असलेला मार्गदर्शक असेल.
- ★ अर्जामध्ये नमूद केलेल्या इतर सर्व सुविधा.

३. निसर्गभ्रमण या योजनेत नोंदणी करण्यासाठी मी स्वत:चा चारित्र्य पडताळणी दाखला व निवास सुरक्षिततेसाठी लागणारे कागदपत्र सोबत जोडत आहे. तसेच माझ्या प्रकल्पाच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे चारित्र्य पडताळणी करून घेण्याची जबाबदारी माझी राहील. त्याचप्रमाणे सदर प्रकल्प राबविण्यासाठी, पर्यटकांच्या व्यवस्थेसाठी व सुरक्षिततेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व कायद्यांचे पालन करणे मला बंधनकारक आहे. यासंबंधी स्थानिक पोलिस स्टेशन, स्थानिक प्रशासन, इतर संबंधित शासकीय विभाग व पर्यटकांकडून काही आक्षेप अथवा तक्रार असल्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाला नोंदणीपत्र रद्द करण्याचा अधिकार आहे याची मला जाणीव आहे.

४. मी महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाला खात्री देतो की, सदर प्रकल्प सुरू असलेल्या जागेच्या मालकी व हक्काबाबत कोणतीही तक्रार असल्यास ती मिटविण्याची जबाबदारी माझी स्वत:ची राहील. जर काही तंटे सुरू झाले व त्याचा पर्यटकांना त्रास झाला किंवा नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळल्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळामार्फत निसर्गभ्रमण अंतर्गत देण्यात आलेली नोंदणी कोणत्याही टप्प्यात रद्द करण्यात येईल याची मला जाणीव आहे.


५. मी या जागेच्या संबंधित सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता केली आहे. सर्व कर व विजेचे देयक वेळोवेळी भरत असतो.

स्थळ :

दिनांक :

नांव आणि स्वाक्षरी

PDF Compressor Free Version



**MAHARASHTRA ECO TOURISM DEVELOPMENT BOARD**

**Bungalow No. 10/2, Starki Town, Mangalwari Bazar, Sadar, Nagpur - 440 001**

T : 0712 - 2978844 | E : mahaecotourism@mahaforest.gov.in